o/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका


जा.क्र.माअधि/अपिल/०६ /२०१९-२०
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती
शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ ०६ /२०१९-२०
दि. ०९ / ०५ /२०१९


<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री. गजानन म्हात्रे (भिवंडीकर)
मु.पोस्ट राई, उत्तन रोड
भाईंदर (प)

......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग

......प्रतिवादी

## :- विवेचन :-

अपिलार्थी श्री. गजानन म्हात्रे (भिवंडीकर) पत्ता मु.पोस्ट राई, उत्तन रोड भाईंदर (प) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान पासुन स्टेशन भाईंदर (प) गटारावरील दुरुस्ती पेव्हर ब्लॉक याचे ऑडीट व त्याची बिले व इतर तपशिल ठराव, आदेश इ. माहितीची मागणी केलेला सदर अर्ज सामान्य प्रशासन विभागास दिल्याचे दिसुन येते. त्याअनुषंगे सामान्य प्रशासन विभागाने सदर माहिती अधिकाराखालील अर्ज सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग केलेला आहे. तथापि श्री.गजानन म्हात्रे (भिवंडीकर) यांनी दि.२०/०४/२०१९ रोजी प्रथम अपिल मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयात दाखल केले असुन सदर अपिलाची सुनावणी दि.०९/०५/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता ठेवण्यात आली होती.

पोच
१०/५/१९
लिपिक

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल:-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान पासुन स्टेशन भाईंदर (प) विभाग गटारावरील दुरुस्ती पेव्हर ब्लॉक याचे ऑडीट व त्याची बिले व इतर तपशिल ठराव, आदेश इ. माहिती मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक व सामान्य प्रशासन विभागातील जनमाहिती अधिकारी यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०९/०५/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र/मनपा/मुलेप/०२/२०१९-२० दि.०२/०५/२०१९ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. गजानन म्हात्रे (भिवंडीकर) (अपिलार्थी)

२) विभाग प्रमुख तथा जनमाहिती अधिकारी सामान्य प्रशासन

३) सहा. लेखापरीक्षक तथा जनमाहिती अधिकारी, लेखापरीक्षण विभाग

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद:-**

जनमाहिती अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी सदर माहिती अधिकारातील अर्ज बांधकाम विभागाकडे वर्ग केल्याचे नमुद केले. त्यानुसार सदरील माहितीसाठी अभिलेख्याचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या माहितीबाबत योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल अशा आशयाचे पत्र अर्जदारास बांधकाम विभागाने दिल्याबाबत सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभागाने सादर केले. तसेच सहा. लेखापरीक्षक तथा जनमाहिती अधिकारी यांनी अर्जातील विषय लेखापरीक्षण विभागासंबंधी नसल्याचे म्हणणे मांडले.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आपल्या युक्तीवादामध्ये बांधकाम विभागाने दिलेल्या पत्रामध्ये शुल्क भरुन अवलोकन करण्याचे पत्र दिल्याचे नमुद केले व अद्याप कोणतीही माहिती बांधकाम विभागाकडुन मिळाली नसल्याचे सांगितले.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-:निर्णय:-**

अपिलार्थी यांनी प्रथम अपिलात अपेक्षिलेली माहिती लेखापरीक्षण विभागात उपलब्ध नसुन सबंधित विभागाशी निगडीत आहे. तथापि माहिती अधिकार कायद्याचा मुळ उद्देश सफल होण्याच्या दृष्टिने सदर अपिल दाखल करुन घेतलेले आहे. सबब जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग यांनी अपिलार्थीने अपेक्षिलेल्या माहितीचे विनामुल्य अवलोकन करुन घेऊन आवश्यक माहिती अपिलार्थी यांना शासकीय नियमाप्रमाणे तात्काळ उपलब्ध करुन दयावी.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई -400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

९.०५.२०१८

(दिग्विजय चव्हाण)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्यलेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति

१) श्री. गजानन म्हात्रे (भिवंडीकर)
मु.पोस्ट राई, उत्तन
भाईंदर (प)

२) जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता
बांधकाम विभाग

३) जनमाहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख
सामान्य प्रशासन

४) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक
लेखापरीक्षण विभाग

पोच
लिपीक
सामान्य प्रशासन
मिरा - भाईंदर महानगरपालिका

पोच

प्रत-

प्रथम अपिलीय अधिकारी बांधकाम विभाग